# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

*(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)*

## परिपत्रक क्र.११३/२०२०

**विषय** : अंतिम सत्र/अंतिम वर्षाच्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षांच्या आयोजनासंदर्भात विद्यार्थ्यांकरीता मार्गदर्शक सूचना.

कोव्हीड १९ च्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऑक्टोबर २०२० मध्ये अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे आयोजन पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील विविध ११३ परीक्षा केंद्रावर Offline (OMR) पद्धतीने करण्यात येत आहे. सदर परीक्षेच्या सुलभ आयोजनासाठी विद्यार्थ्यांकरीता खालील मार्गदर्शक सूचना करण्यात येत आहेत :

१. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित केलेल्या वेळापत्रकानुसार परीक्षांचे आयोजन करण्यात येणार असून सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की त्यांनी, विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित केलेल्या वेळापत्रकाचे (Time-Table) वेळोवेळी अवलोकन करणे आवश्यक आहे.

२. परीक्षेस उपस्थित राहण्यासाठी विद्यार्थ्यांकडे प्रवेश पत्र (हॉल तिकीट) तसेच स्वत:चे फोटो असलेले एक अधिकृत प्रमाणपत्र सोबत ठेवणे अनिवार्य आहे. (उदा. आधार कार्ड, महाविद्यालयाचे ओळखपत्र, वाहनचालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), निवडणूक ओळखपत्र, पॅन कार्ड)

३. या परीक्षेसाठी पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील ११४ महाविद्यालये परीक्षा केंद्रे म्हणून निश्चित करण्यात आली असून, विद्यार्थ्यांनी निवडलेल्या परीक्षा केंद्रानुसार त्यांच्या परीक्षा केंद्राचे नाव विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रावर नमूद करण्यात आले आहे. तरी सदर विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या एक दिवस आधी परीक्षा केंद्राच्या अचूक ठिकाणाविषयी खातरजमा करून घ्यावी, जेणेकरून त्यांना परीक्षेच्या दिवशी निर्धारीत वेळेत परीक्षा केंद्रावर पोहोचणे सुलभ होईल.

४. कोव्हीड १९ च्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या शारिरीक तापमानाच्या तपासणीकरिता विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर नियोजित वेळेपूर्वी एक तास हजर रहावे. प्रवेश केंद्राच्या प्रवेशद्वारावर विद्यार्थ्यांची थर्मल गनने तपासणी करण्यात आल्यानंतरच त्यांना परीक्षा कक्षामध्ये नियोजित वेळेपूर्वी २० मिनिटे अगोदर प्रवेश देण्यात येईल.

५. परीक्षा केंद्रावर तसेच परीक्षेस उपस्थितीचे वेळेस विद्यार्थ्यांनी सतत मुखपट्टी (फेसमास्क) वापरणे व परस्परांमध्ये सुरक्षित अंतर राखणे आवश्यक आहे.

६. विद्यार्थ्यांना सॅनिटायजर तसेच, स्वत:चे पिण्याचे पाणी पारदर्शी बाटलीमध्ये सोबत बाळगता येईल.

७. विद्यार्थ्यांना रफ कामासाठी कोरे कागद/छोटे रफ पॅड ठेवण्याची परवानगी देण्यात येईल. रफ पॅड फक्त रफ काम करण्यासाठी वापरावयाची आहे. सदर रफ पॅड उत्तरपत्रिका जमा करताना संबंधित पर्यवेक्षकाकडे जमा करणे अनिवार्य असेल.

२..

८. परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी काळ्या अथवा निळ्या बॉलपॉईंट पेनचा वापर करावा.

९. विद्यार्थ्यांनी परीक्षेपूर्वी कोव्हीड १९ संदर्भात सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यानुसार स्वयंघोषणापत्र देणे आवश्यक आहे.

१०. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्यांनी सुरक्षित अंतर राखूनच परीक्षा केंद्रातून बाहेर पडावे.

११. पर्यवेक्षकांच्या पूर्व परवानगीनंतरच विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रातून बाहेर पडता येईल.

१२. वरील नियमांचे पालन न करणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षेस बसू न देण्याचे अधिकार परीक्षा केंद्र अधिकाऱ्यांना देण्यात आलेले आहेत याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

१३. अधिक माहितीसाठी खालील दूरध्वनी क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधता येईल:
०२० २५६२१९५१, ०२० २५६२१९५२, ०२० २५६२१९५३, ०२० २५६२१९५४, ०२० २५६२१९५५.

मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था यांना विनंती करण्यात येते की, वरील सर्व सूचनांचे अवलोकन करून याबाबत आपल्या महाविद्यालयातील/संस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरून अवगत करण्यात करावे व विद्यापीठास सहकार्य करावे.

संदर्भ : परीक्षा/एस ॲण्ड टी/ L00
दिनांक : 0९ ऑक्टोबर, २०२०

(महेश काकडे)
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

प्रति,
१. मा. प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था
पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा.
२. मा. परीक्षा केंद्र प्रमुख, पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा.

प्रत माहितीसाठी :
१. मा. प्र-कुलगुरू यांचे कार्यालय,
२. मा. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा यांचे कार्यालय,
३. मा. केंद्रप्रमुख, नाशिक व अहमदनगर उपकेंद्र
४. मा. कुलसचिव यांचे कार्यालय.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**Savitribai Phule Pune University**

*(Formerly University of Pune)*

## COVID-19 virus Self Declaration Form for candidates appearing for OMR based Offline examination

| | | | |
|---|---|---|---|
| **Name of the Candidate :** *(First)* *(Middle)* *(Last)* | | | |
| **Name of the Examination :** | | | |
| **University Permanent Registration Number (PRN):** | | | |
| **Seat No :** | | | |
| **Mobile No :** | **Email id :** | | |

| | | |
|---|---|---|
| **Have you travelled abroad during 2020 ?** | YES | NO |
| **If yes, name of the area(s)/country visited :** | | |
| **Dates of travel :** | | |
| **Date of arrival from abroad :** | | |

| | | |
|---|---|---|
| **Have you been in contact with people being infected suspected or diagnosed with COVID-19** | YES | NO |
| **If yes, your relationship with the people and your last contact date with them** | | |

| | | |
|---|---|---|
| **Please state whether you have experienced/are experiencing the following :** | | |
| **Fever** | YES | NO |
| **Cough** | YES | NO |
| **Shortness of Breath** | YES | NO |
| **Persistent Pain in the Chest** | YES | NO |

**I acknowledge that the information I have given is accurate and complete**

**Date :** Signature :

| | |
|---|---|
| **Office Use Only :**<br>**To,**<br>**The Director, Exam.Centre**<br>**You are requested to preserve this form at the exam. centre and not to be sent to the university office till further order.** | |